# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दिनांक.२७ मे २०१६

---

### सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरनं. व कलम** | : | २७०/२०१६ भादंविसक ३०२, २०१, प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | २४/०५/२०१६ रोजी ०९.०० वा. चे पूर्वी सिव्हील हॉस्पीटल आवारात ए ब्लॉक शेजारी सद्भावना धर्मशाळा पत्राशेडमध्ये, सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | २६/०५/२०१६ रोजी २३.५५ वाजता |
| **फिर्यादी** | | पोनि/ शशिकांत दत्तात्रय दसुरकर नेम. सदर बझार पोलीस ठाणे, सोलापूर शहर |
| **आरोपीचे नांव** | : | अज्ञात इसम |
| **हकिकत** | : | यातील नमुद ठिकाणी अनोळखी स्त्री जातीचे वय-३५ ते ४० हिस कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणाने अज्ञात ठिकाणी जीवे ठार मारुन नग्न आवस्थेत तिची ओळख पटू नये म्हणून तिच्या चेहऱ्याचे मुळरुप नष्ट करुन पुरावा नष्ट करण्याचे हेतूने गग्न आवस्थेत प्रेत टाकून निघून गेला आहे. तपास पोनि जगताप |

### सदरबझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरनं. व कलम** | : | २७१/२०१६ भादंविसक ३७९,प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | १९/०५/२०१६ रोजी रात्री २०.३० वा. चे सुमारास रेल्वेस्टेशन समोरील अमृततुल्य हॉटेल जवळ सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | २७/०५/२०१६ रोजी ०१.२७ वाजता |
| **फिर्यादी** | | अब्दुल रौफ अब्दुल वाहब शेख वय-५२, रा. विजापूर नाका झोपडपट्टी सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ८०,०००/- ॲपेरिक्षा क्र. एमएच-१३ बी व्ही. ०५९० काळा व पिवळा पट्टा असलेली |
| **हकिकत** | : | वरील वर्णनाची व किंमतीची ॲपेरिक्षा महमंद पिरजादे यांचे मालकीची वरील वेळी व ठिकाणी रिक्षास चावी तशीच ठेवून पार्क करुन पाणी पिण्यास गेले असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीची संमतीशिवाय रिक्षा चोरुन नेली आहे. तपास पोहेकॉ/३६९ वाघमारे |

### विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरनं. व कलम** | : | २६१/२०१६ मुपोका ३५३, ३४, मुं.जु. ॲक्ट १२ अ ,प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | | २६/०५/२०१६ रोजी १४.०० वाजता हात्तुरेवस्ती मागे बंद पडलेले मिटरगेजचे रेल्वेरुळाचे सिंमेट कटयावर महेश गंगाधर कोरे यांचे शेताजवळ, सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | २७/०५/२०१६ रोजी ०६.२८ वाजता |
| **फिर्यादी** | | पोसई दत्तात्रय भिमराव लिगाडे, नेम. विजापूर नाका पोलीस ठाणे,सोलापूर शहर |
| **आरोपीचे नांव** | : | मुकेश सिध्दलिंग पाटील २) संतोष तुकाराम गायकवाड, ३) शशांक अंबादास चंद्रवाढ, ४) अविनाश बाळासाहेब माशाळे |
| **मिळाला माल** | : | एकुण - १,४०,३००/- रुपये पैकी जुगारची ४०,३००/- रु. रोख रक्कम, पाच मोबाइल हॅन्डसेट व दोन मोटारसायकली क्र. एम.एच. -१३ बीजी - ९७७१ हिरो स्लेंडर २) एम.एच. -१३ सीसी -४५२४ बजाज प्लसर |
| **हकिकत** | : | फिर्यादी व इतर स्टाफ हा वरील ठिकाणी हद्दीत पेट्रोलिंग करत असतांना फिर्यादीस वरील आरोपींताचा जुगार गुन्हयासंबधी संशय आल्याने फिर्यादी व स्टाफने वरील आरोपीतांना गराडा घालून पकडले त्यावेळी वरील आरोपीतांनी फिर्यादीस आमचेवर केस करता असे म्हणून धक्काबुकी करुन पोलीस स्टाफची गच्ची धरुन धक्काबुकी करुन पळून जात असतांना पाठलाग करुन पकडले आहे. तपास पोसई लिगाडे |

# प्रेस नोट दिनांक २७/०५ /२०१६

## पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर दिंनाक.२६/०५/२०१६ चे नाकाबंदी बाबत.

**पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर हाद्दीत दि.२६/०५/२०१६ रोजी नाकाबंदी केली असता. सदर नाकाबंदी मध्ये एकुण ९८१ वाहने चेक केली असुन पैंकी २३२ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली व त्यांचे कडुन एकुण २६,५००/- रु चा दंड आकारण्यात आला.**

---

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

# प्रेस कॉन्फरन्स दिनांक- २७/०५ /२०१६

मा. पोलीस आयुक्त सा़े, सोलापूर शहर **वाहन चोरी तक्रार पोर्टल** सुरु करत आहेत. त्या संर्दभात पोलीस आयुक्त कार्यालय येथे प्रेस कॉन्फरन्स आज **दिनांक २७/०५/२०१६ रोजी १७.०० वाजता** घेण्यात येणार आहे.

तरी सर्व दैनिक वार्ताहर, इलेक्ट्रॉनिक्स मिडीया यांनी सदर प्रेस कॉन्फरन्स करीता पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर येथे उपस्थित राहवे.

---

## रमजान ईद शांतता कमिटी बैठक दि. २७/०५/२०१६

मा. पोलीस आयुक्त श्री रविंद्र सेनगांवकर सा़े यांचे अध्यक्षतेखाली रमजान ईद सन -२०१६ या अनुषंगाने शहर काझी/ मशिद व मदारसा ट्रस्टी / पदाधिकारी / मौलाना, मिना बझार ट्रस्टी पदाधिकारी यांची शांतता कमिटीची बैठक आज रोजी पोलीस आयुक्त कार्यालय सोलापूर शहर सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर शांतता कमिटीच्या बैठकिसाठी मा. श्री नामदेव चव्हाण, पोलीस उप-आयुक्त (मुख्या), मा. श्रीमती पोर्णिमा चौगुले पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), मा. श्रीमती अपर्णा गिते पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), श्रीमती शिर्मिष्ठा घारगे-वालावलकर, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे), सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग-१ व २ तसेच पोलीस अधिकारी व शांतता कमिटीचे पदाधिकारी व सदस्य आदींची उपस्थिती होती. ( सोबत फोटो पाठविले आहेत.)

---